ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख २० नोव्हेंबर, १९५७ | अंक ४२

## विविध माहिती

**बंगालमधील पुराचें नियंत्रण**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत पश्चिम बंगालमधील पूरनियंत्रक योजनांना आर्थिक मदत म्हणून मध्यवर्ती सरकारनें ७ कोटी रुपये मंजूर केले आहेत. ह्यापैकी ३·१९ कोटी रुपयांची रक्कम दामोदर खोरें योजनेच्या पूरनियंत्रणावर खर्च करण्यांत येणार आहे. ह्या नदीच्या पुरामुळें बंगालमधील लोकांना सर्वांत अधिक धोका उत्पन्न होतो.

**सहकारी बँकेच्या इमारतीचें उद्घाटन**—मध्यवर्ती सरकारचे गृहमंत्री पं. गोविंद वल्लभ पंत ह्यांनीं दिल्ली स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या नव्या इमारतीचें उद्घाटन केलें. ह्यावेळीं बोलतांना त्यांनीं असें सांगितलें कीं, सहकार आणि लोकशाही ह्यांचा फार निकटचा संबंध आहे. सहकाराची वृत्ति वाढल्याशिवाय खरी लोकशाही निर्माण होणार नाहीं.

**पूर्व-जर्मनी कॉफी घेणार**—भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या मार्फत कॉफी बोर्डानें पूर्व-जर्मन सरकारशीं कॉफीच्या विक्रीचा सौदा केला आहे. सौद्यांतील अटीप्रमाणें, पूर्व-जर्मनीचें सरकार ४०० टन कॉफी विकत घेणार आहे. १९५६-५७ सालच्या पिकापैकी आतांपर्यंत १२,००० टन कॉफीची परदेशीं निर्यात करण्याकरतां विक्री झाली आहे.

**उसाच्या वाहतुकीची व्यवस्था**—बिहारमधील साखरेच्या कारखान्यांना लागणारा ऊंस वाहून नेण्यासाठी ट्रॅम्सची सोय करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी मध्यवर्ती सरकारनें ५० लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें असून त्यापैकी ५ लाख रुपये राज्य सरकारला नुकतेंच देण्यांत आलें. राज्य सरकार ऊंस वहातुकीसाठी १·६ कोटी रुपये खर्चून रस्ते बांधणार आहे.

**तिबेटमध्यें दुर्मिळ हस्तलिखितें**— पश्चिम तिबेटमधील एका प्राचीन मठांत भारतांत लिहिलीं गेलेलीं एक लाख दुर्मिळ हस्तलिखितें आहेत, अशी माहिती तिबेटमधील लामांनीं सांगितली आहे. बहुतेक हस्तलिखितें संस्कृतांत लिहिलेलीं असून वैद्यक, फलज्योतिष, शास्त्रें व धर्म ह्या विषयांवरील आहेत. तीं कातड्यावर लिहिलेलीं असून २ फूट रुंद आणि ६ फूट लांब आहेत.

**बंदरांमधील यंत्रसामुग्री**— भारतामधील प्रमुख बंदरांची माल चढविण्या-उतरविण्याची शक्ति वाढविण्यासाठी अद्यावत् यंत्रसामुग्रीची जरूरी भासत आहे. अशा प्रकारची यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी भारत-सरकारच्या वाहतुक खात्याचें एक मंडळ युरोपच्या दौऱ्यावर जाण्यासाठी लवकरच निघणार आहे. पश्चिम युरोपांतील देशांत अशी यंत्रसामुग्री तयार आहे.

**रशिअन शास्त्रज्ञांनीं माहिती पुरविली**—रशिआनें अंतरिक्षांत सोडलेल्या दुसऱ्या उपग्रहाच्या कक्षेविषयींची माहिती आंतरराष्ट्रीय भूविज्ञान वर्षाचे अमेरिकन डायरेक्टर डॉ. हॅनेक ह्यांनीं मागितली होती. ह्या उपग्रहाच्या कक्षेविषयींची उपयुक्त माहिती देण्याच्या बाबतींत रशिअन शास्त्रज्ञांनीं थोडेसें सहकार्य केलें आहे.

**उपग्रहाच्या भीतीचा बळी**— रशिआनें दुसरा उपग्रह अंतराळांत सोडल्यामुळें टोकिओमधील एका २० वर्षें वयाच्या जपानी विद्यार्थ्यानें आत्मघात करून घेतला. दूरगामी अग्निबाण व उपग्रह ह्यांच्या ह्या युगांत युद्ध केव्हां पेटेल त्याचा नेम नसल्यानें असुरक्षिततेच्या भावनेनें व्याकूळ होऊन त्यानें हें कृत्य केलें.

**मोठें कर्ज न मिळण्याची शक्यता**—अमेरिकेंतील वृत्तपत्रांतून आर्थिक विषयावर लिखाण करणारे कांहीं पत्रकार भारताच्या सहा आठवड्यांच्या दौऱ्यावर आले आहेत. त्यापैकीं कांहीं जणांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, अमेरिकेकडून भारताला थोडीबहुत मदत मिळेल, पण मोठें कर्ज मिळण्याची शक्यता कमी आहे. अमेरिका परदेशांना फार कर्जें देतें असें मत अमेरिकेंत प्रभावी होऊं लागलें असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें.

**कृत्रिम रत्नांचा कारखाना**—कृत्रिम रत्नें तयार करण्याचा आशिआंतील पहिला कारखाना कोईमतूर येथें बांधून पुरा करण्यांत आला आहे. कारखान्यासाठी २० लाख रुपयांचें भांडवल लागलें आहे. तो पुढील महिन्याच्या प्रारंभीं खुला करण्यांत येईल. कारखाना उभारण्याच्या कामीं स्वित्झरलंडचें साहाय्य घेण्यांत आलें आहे.

**जपानची मदत घेणार**—म्हैसूरच्या राज्याला २०० मैल लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. ह्या किनाऱ्याचा उपयोग करून खोल समुद्रांतील मच्छीमारीच्या धंद्याची वाढ करण्याचा सरकारचा विचार आहे. त्यासाठी राज्य सरकार एक कंपनी काढणार असून तांत्रिक बाबतींत जपानची मदत घेणार आहे.

**विरोधी पक्षाच्या पुढाऱ्याला पगार**—पश्चिम बंगालचें सरकार विधान सभेंतील विरोधी पक्षाच्या पुढाऱ्याला पगार देण्याचा विचार करीत आहे. मुख्य मंत्री श्री. रॉय ह्यांनीं ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी आमदारांची एक बैठक घेण्याचें ठरविलें आहे. असा पगार देण्याचें ठरलें, तर पश्चिम बंगाल राज्यांतच ती प्रथम देण्यांत येईल. विधान सभेच्या विरोधी पक्षाचे पुढारी सध्यां श्री. ज्योति बसू हे कम्युनिस्ट आहेत.

# पुणें येथील बँकर्स परिषद

**( स्थळ : पुणें सें. को. बँकेचें सभागृह )**

[ दि डेकन बँक्स असोसिएशन व दि पूना बँकर्स असोसिएशन ह्यांच्या विद्यमानें. ]

**शनिवार, २३ नोव्हेंबर, १९५७**

**( सायंकाळीं ४ ते ७ )**

१ परिषदेच्या स्वागताध्यक्षांचें भाषण.

२ उद्‌घाटन ( स्टेट बँक ऑफ इंडियाचे व्हाइस चेअरमन, श्री. न. वि. गाडगीळ )

३ पुस्तकाचें प्रकाशन

४ अध्यक्षांचें भाषण ( डॉ. एस. के. मुरंजन, डी. एससी. लंडन., टॅरिफ कमिशनचे सदस्य )

५ आभारप्रदर्शन.

**( सायंकाळीं ७–३० च्या पुढें )**

बँकिंगसंबंधीं चित्रपट.

१ हाउ बँक्स सर्व्ह

२ पे टु दि ऑर्डर ऑफ

३ व्हॉट इज् ए को–ऑपरेटिव्ह

४ रूरल को–ऑपरेटिव्ह

५ फेडरल रिझर्व्ह सिस्टिम

६ ड्रॅनिंग अँड लेआउट् वर्क

**( रात्रीं ९–१५ वाजतां )**

ऑल इंडिया रेडिओच्या पुणें केंद्रावरून समारंभाचा रेडिओ वृत्तांत.

**रविवार, २४ नोव्हेंबर, १९५७**

| | |
|---|---|
| सकाळीं ९ ते १२ | चर्चा |
| दुपारीं १२–३० ते ३ | भोजनसमारंभ |
| संध्याकाळीं ३ ते ७ | चर्चा ( पुढें चालू ). |

---

### इंडियन इन्स्टिटय़ूट ऑफ आर्किटेक्टसचे नवे अध्यक्ष

इंडियन इन्स्टिटय़ूट ऑफ आर्किटेक्ट्सच्या अध्यक्षपदीं श्री. वॉल्टर जॉर्ज ह्यांची निवडणूक झाली आहे. त्यांचा जन्म मँचेस्टर येथें आर्किटेक्ट्सच्या एका घराण्यांत झाला. लंडन येथें ते पेंटिंग, डिझाइनिंग, स्कल्पचर व आर्किटेक्चर शिकले. त्यांनीं युरोपमध्यें पुष्कळ प्रवास केलेला आहे. स्पार्टा व इजिप्त येथें त्यांनीं बऱ्याच उत्खननांत भाग घेतला असून त्यांवर त्यांनीं बरेच ग्रंथ लिहिलेले आहेत. १९१५ मध्यें ते भारतांत आले व तेव्हांपासून त्यांचा येथील आर्किटेक्चरच्या व्यवसायाशीं घनिष्ठ संबंध आहे.

---

### झहिद हुसेन ह्यांचा मृत्यु

पाकिस्तानच्या कर चौकशी मंडळाचे अध्यक्ष श्री. झहिद हुसेन हे कराची येथें गेल्या आठवड्यांत मरण पावले. स्टेट बँक ऑफ पाकिस्तानचे ते पहिले गव्हर्नर होते. गेल्या वर्षअखेरपर्यंत ते पाकिस्तानी नियोजन मंडळाचे अध्यक्ष होते.

**दोहद येथें इस्पितळ**—दोहद म्युनिसिपालिटीनें गांवांत एक इस्पितळ व सुसज्ज शस्त्रक्रिया गृह बांधण्याचें ठरविलें आहे. इस्पितळासाठीं दोहद येथील एका दानशूर गृहस्थानें २५,००० रुपयांची देणगी दिली आहे. इस्पितळाला देणगीदाराचें नांव देण्यांत येणार आहे.

**अणुशक्तीवर चालणारी बोट**–कैरो येथें रशिआनें अणुशक्तीच्या शांततामय उपयोगाचें एक प्रदर्शन भरविलें आहे. प्रदर्शनाचें उद्‌घाटन करतांना रशिआचे तेथील वकील म्हणाले कीं, सध्या अणुशक्तीवर चालणारी एक बोट बांधण्याचें काम रशिआंत चालू आहे. तिला दोन वर्षेपर्यंत जळण द्यावें लागणार नाहीं, असा अंदाज आहे.

**केरळमधील पूरनियंत्रणाला मदत**—१९५७–५८ सालीं काम करण्याच्या हंगामांत केरळमधील तीन नद्यांवरील पाटबंधाऱ्यांच्या योजना चालू ठेवण्यांत येणार आहेत. ह्या योजनांना गेल्या सालीं प्रारंभ करण्यांत आला असून त्यावर २९,००० रुपये खर्च करण्यांत आले आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत केरळमधील पूरनियंत्रक कामासाठी मध्यवर्ती सरकारनें १ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

**पुरुषाला अधिक धोका**— टोकिओ विद्यापीठांत काम करणाऱ्या जपानी शास्त्रज्ञांनीं असें जाहीर केलें आहे, कीं अणुबॉम्बच्या स्फोटांमुळें जें किरणोत्सर्गी द्रव्य पसरतें त्यापासून पुरुषांच्या जननक्षमतेला स्त्रियांपेक्षा अधिक धोका आहे. रेशमाच्या किड्यांच्या नरांवर होणारा परिणाम निरीक्षण करून त्यांनीं वरील निष्कर्ष काढला आहे.

---


# बँक ऑफ पूना, लिमिटेड

**—शेड्यूल्ड बँक—**

व्याजाच्या दरांत १% चा फरक म्हणजे १०,००० रुपयांवर १०० रु. होतात. हे शंभर रुपये तुम्हांला आणखी १ ते ४ रुपये मिळवून देतात.

आमच्या सेव्हिंग्ज बँक ठेवी मागणीसरशीं परत केल्या जातात. पूर्वसूचनेची आवश्यकता नाहीं.

२½% दरानें व्याज दिलें जातें.

बँकेंत तुम्हीं तासनतास वाया घालवूं इच्छित नाहीं.

दक्षतेच्या कारभारासाठीं आणि तुमच्या गुंतवणुकीवर अधिक व्याज मिळविण्यासाठीं बँकांच्या खालील कचेऱ्यांत चौकशी करा :—

**( १ ) ४५५, रविवार पेठ, पुणें २.**
**( २ ) ५४, डे. जि. कॉलनी, पुणें ४.**
**( ३ ) ३६१, सदाशिव पेठ, पुणें २.**
**( ४ ) वखार भाग, सांगली.**

# अर्थ

बुधवार, ता. १० नोव्हेंबर, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रशिआच्या आर्थिक मदतीचें स्वागत

भारताच्या औद्योगीकरणास आर्थिक मदत मिळविण्यासाठी अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी नुकतेंच परदेशांचा दौरा करून परत आले. त्यांच्या ह्या दौऱ्याची प्रत्यक्ष फलनिष्पत्ती काय तें अद्याप ठरावयाचें आहे. दरम्यान, सोव्हिएट रशिआनें भारताला ५० कोटी रुबल्स अथवा सुमारें ६० कोटी रुपये कर्ज देण्याचें कबूल केलें असून उभयतां देशांत त्याप्रमाणें करारहि करण्यांत आला आहे. कर्जाचा विनियोग करून भारत नाना प्रकारची यंत्रसामुग्री रशिआकडून घेणार आहे. ह्या यंत्रसामुग्रींत भारी यंत्रसामुग्री तयार करण्याचा एक मोठा कारखाना, कोळशाच्या खाणींच्या यंत्रसामुग्रीचा कारखाना, दुर्बिणीसारख्या वस्तूंना लागणाऱ्या कांचा तयार करण्याचा कारखाना, इत्यादींचा समावेश आहे. ही सर्व यंत्रसामुग्री भारतांत आल्यापासून एका वर्षानें कर्जाची फेड करण्यास सुरवात व्हावयाची आहे. व्याजाचा दर २॥ टक्के असून १२ सारख्या हप्त्यांनीं कर्जफेड करण्याचें ठरलें आहे.

भारताला रशिआनें दिलेल्या ह्या मदतीसंबंधीं ब्रिटनमधील मॅंचेस्टर गार्डिअन ह्या पत्रानें पुढीलप्रमाणें विचार व्यक्त केले आहेत. तें म्हणतें कीं, ह्या मदतीमुळें रशिआच्या औदार्याची आणि पाश्चिमात्य राष्ट्रांच्या चिकटपणाची भारतांत साहजिकच तुलना करण्यांत येईल. कारण, भारतामधील लोकांच्या मनांत श्री. कृष्णम्माचारींचा परदेशांचा फारसा उत्साहजनक न ठरलेला दौरा अद्याप ताजा आहे. पौर्वात्य व पाश्चात्य देशांतील मैत्रीच्या दृष्टीनें रशिआच्या मदतीचें स्वागतच केलें पाहिजे. ब्रिटन व अमेरिका ह्या दोन्ही देशांत भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमाला यश यावें, अशी भावना आहे. कारण, भारताची अधिक भरभराट झाली तर जगाची स्थितीहि अधिक स्थैर्याची होईल ह्याची जाणीव त्या देशांत आहे. श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं ब्रिटन अगर अमेरिकेकडून निश्चित अशीं वचनें मिळविलेली नाहींत ही गोष्ट खरी; पण भारताच्या गरजा काय आहेत ह्यासंबंधींची माहिती तरी त्यांनीं योग्य रीतीनें दिली आहे. भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या यशाचें महत्त्व अमेरिकन लोकांना चांगलें कळलें असल्यामुळें भारताच्या मदती-संबंधीचा प्रश्न अमेरिकन कॉंग्रेसपुढें येईल त्यावेळीं रशियाच्या कर्जाचीहि दखल घेतली जाईल. पुष्कळदां असें सांगण्यांत येतें कीं, पाश्चिमात्य राष्ट्रांनीं भारताला मदत केली नाहीं तर तो देश कम्युनिस्ट होईल. खुद्द भारतामधील कांहीं राजकारणपटूंनाहि असें वाटतें कीं, लोकांच्या राहणीचा दर्जा सुधारण्याच्या बाबतींत भारताची व चीनची स्पर्धा चालू आहे. पण खरोखर तसें नाहीं. स्पर्धा असलीच तर ती लोकशाही मार्गानें राहणीचा दर्जा सुधारण्याची आहे. तेव्हां पंचवार्षिक कार्यक्रम यशस्वी झाला तर भारत कम्युनिझमपासून वांचेलच असें म्हणतां यावयाचें नाहीं. ह्यांत तथ्य इतकेंच आहे, कीं भारतामधील लोकशाही सरकारला लोकांचें जीवन अधिक सुसह्य करण्यांत यश आलें नाहीं तर भारतामधील लोकशाहीला धोका उत्पन्न होईल.

खुद्द ब्रिटनला भारतापुढील प्रश्न सोडविण्याच्या कामीं फारसें कांहीं करतां येण्यासारखें नाहीं. दिली त्यापेक्षा अधिक मदत द्यावयाची झाल्यास, जाणीवपूर्वक राजकीय निर्णय घ्यावा लागेल आणि ब्रिटनमधील लोकांना अधिक उत्पादन करून हल्लींपेक्षा कमी दर्जानें रहाण्याची तयारी करावी लागेल.

---

## भारतांतील परकीय कंपन्यांतील हिंदी नोकर

### १० वर्षांत ११ पट वाढ

### परदेशीय नोकरांतील ८८% ब्रिटिश

भारतांतील परकीय मालकीच्या वा त्यांच्या नियंत्रणाखालील औद्योगिक आणि व्यापारी कंपन्यांतील १,००० रुपये व त्याहून जास्त वेतन मिळणाऱ्या भारतीय नोकरांचें प्रमाण आणखी वाढलेलें आहे. या वेतन गटांतील भारतीय व परदेशीय नोकरांची संख्या पुढीलप्रमाणें होती.

| वर्ष | भारतीय | परकीय | एकूण |
|---|---|---|---|
| १९४७ | ५०४ | ५,८४४ | ६,३४८ |
| १९४८ | ७४२ | ६,३६० | ७,१०२ |
| १९४९ | १,०८५ | ६,७०९ | ७,७९४ |
| १९५० | १,४०६ | ६,८७१ | ८,२७७ |
| १९५१ | १,७८४ | ६,९५३ | ८,७३७ |
| १९५२ | २,२९० | ७,१०४ | ९,३९४ |
| १९५४ | ३,३४६ | ७,००८ | १०,३५४ |
| १९५५ | ३,९९५ | ६,८१० | १०,८०५ |
| १९५६ | ४,६८५ | ६,५६६ | ११,२५१ |
| १९५७ | ५,६१४ | ६,०२५ | ११,६३९ |

परकीय मालकीच्या व नियंत्रणाखाली चाललेल्या कंपन्यांतील भारतीय नोकरांचें प्रमाण गेल्या दहा वर्षांत जवळ जवळ अकरा पटींनीं वाढलेलें असून १९५६ नंतर परदेशियांची संख्या घटत असल्याचें या तक्त्यावरून दिसून येतें.

एक हजार आणि त्याहून अधिक वेतनगटांची विभागणी केली असतां १,०००–१,५०० या श्रेणींत सध्यां ८० टक्के जागा भारतीयांकडे आहेत. १९५६ व १९५५ मधील हेंच प्रमाण अनुक्रमें ६७·९ व ६१·५ टक्के असें होतें. त्यानंतरच्या म्हणजे १,५०१ ते ३,००० रु. या श्रेणींतील ४०·९ टक्के जागांवर सध्यां भारतीय काम करीत आहेत. १९५६ व १९५५ मधील हेंच प्रमाण अनुक्रमें ३४ व २७·४ टक्के असें होतें. त्यानंतरच्या म्हणजे ३,००० रुपयांहून अधिक वेतनाच्या श्रेणींत सध्यां ११·४ टक्के जागांवर भारतीय आहेत. १९५६ व १९५५ मधील हेंच प्रमाण अनुक्रमें १०·६ व ७·९ टक्के असें होतें.

या वेतन-श्रेणींतील ६०२५ परदेशीय नोकरांपैकी ८८ टक्के नोकर ब्रिटिश व ३·६ टक्के अमेरिकन आहेत.

## स्वतःच्या खात्यांत भरावयाच्या चेकवर एंडॉर्समेंट जरूर नाहीं

### ब्रिटिश कायद्यांत सुधारणा

ग्रेट ब्रिटनमध्यें चेक्सविषयक नवा कायदा १७ ऑक्टोबर रोजीं अंमलांत आला. त्या कायद्यानें केलेल्या सुधारणांत सर्वांत महत्त्वाची दुरुस्ती एंडॉर्समेंटच्यासंबंधीं आहे. आतां जे खातेदार स्वतःच्या खात्यांत चेक भरतात, त्यांनीं त्या चेकवर एंडॉर्समेंट करण्याचें कारण राहिलेलें नाहीं. लंडनमधील बँकांकडे दरसाल सुमारें ७० कोटी चेक्र भरले जातात, त्यांपैकी ९०% चेक्र वरील अपवादांत येतील. म्हणजे, त्यांचेवर खातेदारांची सही आवश्यक राहणार नाहीं. कौंटरवर रोख रक्कम मिळविण्यासाठी दाखल केलेल्या चेकवर मात्र खातेदाराला सही करावी लागेल. कारण, त्यामुळें बँकेनें कोणाला रक्कम दिली, त्याची ओळख राहील.

चेक्सप्रमाणें डिव्हिडंड वॉरंट्सवरहि एंडॉर्समेंटची आवश्यकता उरणार नाहीं.

---

### कागदाच्या क्लिप्सची खानेसुमारी

कचेऱ्यांतून कागद एकत्र ठेवण्यासाठीं क्लिपा वापरण्यांत येतात. परंतु प्रत्यक्ष वापराच्या मानानें कितीतरी पट ज्यास्त क्लिपा खरेदी केल्या जातात, असा सर्वत्र अनुभव आहे. अमेरिकेंत एका कमिटीनें १,००,००० क्लिपांचें संशोधन केलें, तेव्हां असें आढळून आलें, कीं त्यांपैकी फक्त एक पंचमांशाचा वापर नियोजित कार्यांत करण्यांत आला. उरलेल्या ८०,००० क्लिपांचा उपयोग खालील प्रमाणें झाला:—

| | |
|---|---|
| ३,१९६ | पाइप स्वच्छ करण्यासाठीं |
| ५,३०८ | नखें स्वच्छ करण्यासाठी |
| ५,४३४ | दात व कान कोरण्यासाठी |
| १९,४१३ | पत्ते खेळतांना लावलेल्या पैशांच्या हिशेबासाठी |
| १४,१६३ | टेलिफोनवरील कंटाळवाणें बोलणें चालू असतांना हातानें चाळा म्हणून मोडण्यासाठी |
| ७,२०० | हूक म्हणून कामचलाऊ उपयोग करण्यासाठी |

बाकीच्या क्लिपा फरशीवर पडून झाडण्यांत गेल्या किंवा लहान मुलांनीं गिळून टाकल्या !

---

**कुटुंबनियोजनाचीं केंद्रें**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत मुंबई राज्यांतील ग्रामीण विभागांत २,००० कुटुंबनियोजन केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. अशींच ५०० केंद्रें शहरांतून स्थापन करण्यांत येणार आहे. समाजशास्त्रज्ज्ञांच्या मतानें एका जोडप्याला तीन मुलें असणें योग्य समजलें जातें. म्हणजे, पांच जणांचें कुटुंब आदर्श असें मानण्यांत येतें.

**शेतीच्या मालासाठी वखारी**—येत्या सहा महिन्यांच्या अवधींत मुंबई राज्यांत शेतीचा माल सांठविण्यासाठी ८५ वखारी बांधण्यांत येणार आहेत. शेतीचा माल सांठविण्याच्या सोयी नसल्यामुळें शेतकऱ्याला आपला माल पुष्कळदां मंदीच्या भावानें विकावा लागतो. त्याला त्याच्या मालाची योग्य किंमत मिळावी म्हणून ह्या वखारी बांधण्यांत येत आहेत.

**नेपाळांत तांदुळाचा तुटवडा**— नेपाळच्या पूर्व भागांत अवर्षणामुळें तांदुळाचा तुटवडा पडला आहे. तांदुळाची टंचाई कमी व्हावी म्हणून नेपाळला ५०,००० टन तांदुळाची तावडतोब गरज आहे. नेपाळच्या सरकारनें ब्रह्मदेशाकडे २०,००० टन तांदुळाची मागणी केली आहे व त्याची किंमत भारताच्या रुपयांत देण्याची तयारी दर्शविली आहे.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— वृ. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार



किर्लोस्कर
अिलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक रचना परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

# बँकिंग-क्षेत्रांतील 'दरयुद्ध' परिस्थिति

## नियोजन-संमत, समाज-हितकर धोरणाची अपेक्षा

(लेखक : श्री. वा. ग. अळतेकर, बी. कॉम., मॅनेजिंग डायरेक्टर, पुणें सें. को. बँक लि.)

श्री. चिं. वि. जोग यांनीं 'अर्थ'च्या दिपावली अंकांत 'दरयुद्ध परिस्थिति'वर आपले विचार तपशीलवार मांडले आहेत. श्री. जोगांचे मतें या 'दरयुद्ध परिस्थितीचें मूळ' १९५५ मध्यें बँक ऑफ इंग्लंडनें बँक रेट ३·१।२ टक्के वरून ४·१।२ टक्के नेला या घटनेंत आहे. बँक ऑफ इंग्लंडनें बँक रेट वाढवला त्यामुळें भारतांतील एक्स्चेंज बँका भारतांतच ठेवीवर जास्त व्याज देऊन ठेवी वाढवणें पसंत करूं लागल्या आणि त्यांनीं सुरवात केल्यावर भारतीय बँकांना तटस्थ राहतां येणें शक्य नव्हतं त्याहि 'भाववाढींत' सामील झाल्या. इंग्लंडमधील बँक रेट वाढवला म्हणजे त्याचा असा परिणाम होईल असें मानणें सयुक्तिक वाटत नाहीं. 'अर्था'चे याच दिपावली अंकांत श्री. प्रवीणचंद गांधी यांचा एक लेख आहे. त्यामध्यें त्यांनीं इंग्लंडमधील बँक रेट व भारतांतील बँक रेट यासंबंधीं एक परिच्छेद लेखाच्या अखेरीस लिहिलेला आहे. त्यामध्यें "इंग्लंडमधील नाणेबाजारावर भारतामधील नाणेबाजार अवलंबून नसल्यानें, भारतामधील परिस्थितीमुळें दर वाढवावा लागेल तरच तो वाढविण्यांत येईल" असें विधान केलेलें आहे आणि तें विधान सयुक्तिक वाटतें.

### व्याजाचे दर कां वाढले?

सध्यां ठेवीवरील व्याजाचे दर वाढविण्यास कोणती परिस्थिति कारणीभूत झाली आहे ती आपण पाहूं. १९५१ पासून आपल्या पंचवार्षिक योजना सुरू झाल्या. या योजनांमुळें मध्यवर्ति व प्रांतिक सरकारचा प्रतिवर्षी होणारा भांडवली खर्च वाढूं लागला. आपली दुसरी योजना तर बरीचशी वादाचा व टीकेचा विषय होऊन बसली आहे. या योजनेमध्यें अपेक्षित खर्च सुमारें ५६०० कोटी रुपयांचा आहे. एवढी रक्कम उपलब्ध करण्यासाठी मुख्य मार्ग तीनच आहेत. (१) सरकारी कर्जरोखे, लहान बचत योजना, या मार्गांनीं अधिक रक्कम मिळविणें, (२) परदेशाकडून कर्जरूपानें मदत मिळविणें, (३) चलनवाढ करून तूट भरून काढणें.

परदेशाकडून अपेक्षित मदत येईलच असा भरंवसा नाहीं. एवढेंच नव्हे तर हुंडणावळीच्या अडचणीमुळें कांहीं योजना पुढें ढकलाव्या लागतात कीं काय अशी साधार भीति वाटूं लागली आहे. चलनवाढीनें सर्वच तूट भरून काढणें अव्यवहार्य आहे. यामुळें सहाजिकच सरकारचें अधिक लक्ष कर्जरोखे, लहान बचती यामध्यें जनतेनें गुंतवणूक करावी इकडे वेधलें गेलें आहे. अधिक आकर्षक करण्यासाठी सरकारला त्यावरील व्याजाचे दर वाढविणें भाग पडलें आहे. उद्योगधंद्यांचें क्षेत्र विस्तारत आहे. त्यामुळें सहाजिकच खाजगी ठेवीवरील व्याजाचे दरहि वाढले आहेत व वाढत आहेत. बँकांच्याकडेहि कर्जमागणीचें प्रमाण वाढल्याचेंच दिसून येतें. मागणी जास्त आणि पुरवठा मर्यादित अशी कांहींशी परिस्थिति असल्यानें त्याचा परिणाम दरवाढींत झालेला आहे. प्रगत अर्थरचनेमध्यें (Developing Economy) असें घडणें अपरिहार्य आहे.

### कोणाकडील ठेवी वाढल्या?

ज्या एक्सचेंज बँकांवर या परिस्थितीचें कारण लादण्यांत आलें आहे त्यांची माहिती इथें देणें अप्रस्तुत ठरणार नाहीं. भारतांत एकूण एक्स्चेंज बँका १५ आहेत. त्यांच्याकडील गेल्या ४ वर्षांतील एकूण सरासरी ठेवी खालीलप्रमाणें होत्या.

| | | |
|---|---|---|
| १९५२-५३ | १७०·०३ | कोटि रुपये |
| १९५३-५४ | १६३·२४ | " |
| १९५४-५५ | १७०·८४ | " |
| १९५५-५६ | १९०·९५ | " |
| १९५६-५७ | १८७·३९ | " |

मार्च १९५७ पासून या ठेवी वाढत वाढत सप्टेंबर अखेर २०७·१३ कोटीवर गेल्या आहेत. याच अवधींत भारतीय शेड्यूल्ड बँकांच्या ठेवी खालीलप्रमाणें होत्या.

| | | |
|---|---|---|
| १९५२-५३ | ६६३·०९ | कोटि रुपये |
| १९५३-५४ | ६७२·०७ | " |
| १९५४-५५ | ७२५·८५ | " |
| १९५५-५६ | ८१२·५९ | " |
| १९५६-५७ | ९०७·५२ | " |

जानेवारी १९५७ अखेर ९२३·२० कोटीवरून सप्टेंबर १९५७ अखेर एकूण ठेवी १०९६·९७ कोटी एवढया वाढल्या आहेत. म्हणजे गेल्या ९ महिन्यांत सुमारें १७३·७७ कोटींनीं ठेवी वाढल्या आहेत. म्हणजे ठेवीवरील दर वाढविल्यामुळें जास्तींत जास्त ठेवी भारतीय बँकांच्याच वाढल्या आहेत हें स्पष्टपणें दिसून येतें.

### झपाट्यानें झालेली कर्जवाढ

भारतीय शेड्यूल्ड बँकांचे कर्जाचे ठेवीशीं प्रमाण जेमतेम ७० टक्के आहे, हें श्री. जोगांचे विधान अर्धसत्य आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सुमारें ३५० कोटींच्या ठेवी आहेत. स्टेट बँक ऑफ इंडियाचे कर्जाचे ठेवीशीं प्रमाण जास्त नाहीं. म्हणजे इतर बँकांचें जास्त असूनहि स्टेट बँकेचें कमी असल्यानें सरासरी मान ७० टक्के इतपत राहिलें आहे. ही वस्तुस्थिति नाकारून चालणार नाहीं. स्टेट बँक यांतून वगळली तर हें प्रमाण निश्चितच वाढेल. दुसरें असें कीं, कर्ज रक्कम वाढूनहि ठेवी वाढवल्यावर प्रमाण खालीं राहूं शकते आणि नेमकें असेंच घडलें आहे हें आपल्याला दिसून येईल.

जानेवारी १९५७ मध्यें भारतीय शेड्यूल्ड बँकांचें एकूण कर्ज ६११·७१ कोटी रुपयांवरून मार्चमध्यें ६७०·७१ कोटी रुपयांवर गेलें.

गेल्या आठ महिन्यांतील भारतीय बँकांनीं दिलेलें एकूण कर्ज खालीलप्रमाणें आहे.

| | | |
|---|---|---|
| जानेवारी | ६११·७१ | कोटी रु. |
| फेब्रुवारी | ६५०·०० | " |
| मार्च | ६७०·७७ | " |
| एप्रिल | ६९५·८१ | " |
| मे | ७२३·२७ | " |
| जून | ७१७·७४ | " |
| जुलै | ६८४·५८ | " |
| ऑगष्ट | ६६१·९२ | " |
| सप्टेंबर | ६३६·६६ | " |

१९५५-५६ ची एकूण कर्जाची सरासरी ४६६·६७ कोट रुपये होती. ही गोष्ट लक्षांत घेतली कीं, कर्जवाढ किती झपाट्यानें होत आहे हें दिसून येतें.

यामुळेंच रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांना जून २९, १९५७ ला पत्रक काढणें भाग पडलें. त्यांतला सारांश असा कीं, "गेलीं चार वर्षे बँक-कर्ज वाढतच आहे. परंतु गेल्या दोन वर्षांत ही वाढ फार मोठ्या प्रमाणावर झाली आहे. १९५५ मधें ६१२ कोटी होती (सर्व बँका धरून) ती आतां १९५७ मधें ९३२ कोटीवर गेली आहे. या वाढीचें वैशिष्ट्य म्हणजे मे ते ऑक्टोबर कर्जाचें प्रमाण धंदास मंदी असल्यामुळें जें कमी असावयास पाहिजे, तेंहि आतां कमी नाहीं. उलट तें १९५५-५६ मधें वाढलेलेंच दिसून आलें. धंद्याचें क्षेत्र वाढल्यामुळें कांहीं वाढ झाली असली तर कांहीं वाढ शेतीमालाचा सांठा करून नफेबाजीहि झाली आहे.

### बँकांवरील जबाबदारी

"या कर्जवाढीमुळें बँकांवर मोठा आर्थिक ताण पडला आहे. योजनांवरील वाढत्या खर्चांमुळें बँकांच्या ठेवी वाढतच रहाणार आहेत. आणि त्यामुळें कर्जरक्कम आणखी वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मंदीच्या (स्लॅक सीझन) सुरुवातीसच बँकांनीं आपल्या कर्जांची व धोरणाची पहाणी करावी.

"बँकांनीं चलनवाढ काबूंत ठेवण्याच्या हेतूनें कर्जें फार सावधपणें देणें हितावह आहे. मंदीच्या (स्लॅक सीझन) शेतीमालावरील तसेंच, आयात केलेल्या मालावरील कर्जाचें प्रमाण कमी करणें इष्ट आहे. या मालाची सांठेबाजी करून तें अधिक भावानें विकलें जाण्याची शक्यता आहे.

"मंदीच्या काळांत (स्लॅक सीझन) कर्जाचें प्रमाण जर कमी केलें तर हंगामाचे काळांत जो जादा आर्थिक ताण बसेल तो सहन करणें बँकांना सोपें जाईल. बँकांचें एकूण कर्ज कमी करण्याच्या या कामांत मी आपलें सहकार्य मागतों."

### ठेवीदारांचें काय चुकलें?

ठेवीदारांनाहि बाजारपेठ झाली असून अधिक व्याजासाठी थंडें युद्ध चालू आहे, असें श्री. जोगांचें म्हणणें आहे. शेवटीं बँकांचा धंदा चालतो तो त्यांच्याकडे येत असणाऱ्या ठेवींवर. प्रतिवर्षी पगाराचे व व्याजाचे खर्च वाढते असूनहि, बँकांचें नफ्याचें प्रमाण वाढतेंच दिसून येत आहे. वाढलेलें उत्पन्न वाढलेल्या गुंतवणूकीवर अवलंबून असतें आणि गुंतवणूक ठेवीदारांच्या ठेवीवर अवलंबून असते. मग ठेवीदारानें अधिक दर मागितला तर त्याचें चुकलें कोठें?

### नियोजन काळांतील पथ्यें

परिस्थिति अशी आहे कीं, आपल्या राष्ट्राचीं हीं पांच वर्षें व पुढीलहि कांहीं वर्षें अत्यंत कष्टाचीं, त्यागाचीं आणि आणीबाणीचीं जाणार आहेत. परदेशी हुंडणावळीची तूट, अन्नधान्याची तूट, तुटीचें अर्थकारण, वाढती लोकसंख्या व बेकारी असे फार मोठे ज्वलन्त प्रश्न आपल्यापुढें उभे आहेत. या सर्वांना आपणांस यशस्वी रीतीनें तोंड द्यावयाचें आहे. यामध्यें एखादा कुणी कांहीं करूं शकेल असें मानणें गैर होईल. सर्वांनींच परिस्थिति जाणून त्याप्रमाणें आचरण ठेवलें पाहिजे. आमच्या बड्या व्यापारी बँकांनीं अन्नधान्यांचे तारणावर जास्ती दिलेल्या कर्जाबद्दलची जाहीर वाच्यता झाली. आणि त्याबाबत रिझर्व्ह बँकेनें काढलेल्या परिपत्रकामुळें झोंबण्याचें कांहीं कारण नाहीं. अन्नधान्यांचे भाव वाढत असतांना त्यांचे तारणावर कर्ज देतांना तुम्हीं तुमच्या खातेदाराची सोय करतां आहांत, हें म्हणणें सामाजिक दृष्ट्या कितपत समर्थनीय आहे?

याबाबत एक हकीकत निर्देश करण्यासारखी आहे. नुकतीच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अयंगार यांनीं या कर्जांचे धोरणाबाबत मोठ्या बँकांची एक सभा घेतली होती. त्यावेळीं बँकांकडून असें सांगण्यांत आलें कीं, हीं कर्जें आमच्या शाखांचेकडे आहेत. या विधानावरून आम्हीं समजायचं तरी काय? शाखांवर मुख्य कचेऱ्यांचे कांहीं नियंत्रण आहे कीं, नाहीं?

आपल्या राष्ट्रांत सध्यां नियोजनाचें पर्व सुरू झालें आहे. कित्येक तपें तें चालणार आहे. नियोजन म्हटल्यावर कांहीं सामाजिक पथ्यें पाळणें अपरिहार्य आहे. नियोजनाचे काळांत राष्ट्रांतील आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण असणें अत्यंत महत्त्वाचें असतें, आणि त्याकरितां राष्ट्रांतील बलवान् आर्थिक संस्थांचे मिळून एकसूत्र धोरण असणें आवश्यक आहे. त्यामध्यें भारतीय बँकांचें स्थान फार मोठें आहे-व मानाचें आहे. त्यांच्याकडून नियोजन-संमत अशा समाज-हितकर धोरणाची अपेक्षा व्यक्त केली, तर वावगें होणार नाहीं.

---

**ज्वालामुखीच्या शक्तीचा उपयोग**—सायबेरिआंतील ज्वालामुखींच्या शक्तीचा उपयोग करून वीज निर्माण करणारें एक विद्युत्केंद्र बांधण्यास रशिआनें प्रारंभ केला आहे. बेअरिंगची सामुद्रधुनी व ओखाटस्कचा समुद्र ह्यांच्या दरम्यान असलेल्या ज्वालामुखींतील गरम झऱ्यांच्या शक्तीचा ह्या कामीं उपयोग करून घेण्यांत येणार आहे.

**२५० कोटींचा नवा धंदा**—सरकारी आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. जी. आर. कामत ह्यांनीं मुंबई येथें पत्रकारांशीं बोलतांना असें सांगितलें कीं, १९५७ सालीं कॉर्पोरेशन २५० कोटी रुपये किंमतीचा नवा धंदा करील असा अंदाज आहे. ऑक्टोबरअखेर कॉर्पोरेशननें १७७ कोटींचा नवा धंदा केला आहे अशी माहिती त्यांनीं दिली.

**खाजगी बँकांचें राष्ट्रीयकरण नाहीं**—स्टेट बँक ऑफ इंडिआचे उपाध्यक्ष श्री. न. वि. गाडगीळ अहमदाबाद येथें बोलतांना म्हणाले कीं, खाजगी बँकांनीं आपलें काम योग्य रीतीनें केल्यास त्यांचें राष्ट्रीयकरण केलें जाण्याची शक्यता नजीकच्या भविष्यकालांत दिसत नाहीं. देशाच्या आर्थिक धोरणाशीं विसंगत असें मात्र त्यांना वागतां येणार नाहीं.

---

## "तुमचें स्थान कोणतें?"

श्री. श्री. वा. काळे ह्यांस स. न. वि. वि.

रोजचा व्यवहार व्यावहारिक नीतिमत्ता पाळून किती वरच्या पातळींत नेतां येणें शक्य असतें, आणि त्यामुळें सर्वांनाच आपलें भौतिक जीवन सहजगत्याच सुखी आणि आनंदी कसें करतां येतें, याची सुलभ शिकवण महाराष्ट्रीय समाजाला देण्याचें महान् कार्य आपल्या तीनहि पुस्तकांनीं अत्यंत यशस्वीपणें केलें आहे याबद्दल सारा सुशिक्षित व विचारी महाराष्ट्रीय समाज आपणांस निरंतर धन्यवाद देईल. आपल्या कार्यांत उत्तरोत्तर वाढतें यश चिंतणारा,

जमखंडी
२९-१०-१९५७ } म. कृ. खाडिलकर

लेखक: श्री वा. काळे, पृ. सं. १२० किं. २ रु. ट. ख. १५ नये पैसे

## कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: –श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

## સુખી જીવનની પગદંડી
( ગૃહજીવનનું માંગલ્ય )
લેખક:—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, "અર્થ"
ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂ. ૧-૮-૦

# * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *
( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०४०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४१०
खेळतें भांडवल ... ... रु.५८,००,०००

उपाध्यक्ष श्री. द्वा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १३/४% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

# दि सांगली बँक लि.
सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

वसूल भांडवल रु. ४,५०,०००
रिझर्व्हस् व इतर फंडस् रु. ७,००,०००
खेळतें भांडवल अदमासें रु. २,००,००,०००

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सिताराम बिल्डिंग, कॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलिपत भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★
श्री रा. सा. भ. ना. ढोबळे, ( अध्यक्ष )
श्री. गे. गो. ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. ज. भा. तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. म. बा. वेंडे, ( ऑ. खजिनदार )
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,
श्री. आ. पां. ढोरे ,,
श्री. ज्ञा. मा. मनसुख ,,
श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवी वरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०१,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,०३० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-८-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी,
बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे,
बी. ए., एलएल. बी., चेअरमन



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना : १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

| टेलिफोन | चेअरमन— | पोस्ट बॉक्स नं. ४७२ |
|---|---|---|
| नं. २५५४७४-७५ | श्री. रमणलाल जी. सरैय्या | तारेचा पत्ता—फार्मर बँक |

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ४४,११,५०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | ३१,००,००० |
| | रु. | ७१,११,५०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ५९,२८,१०० |
| ठेवी | रु. | १०,७१,३३,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १७,६३,७३,००० |

### ११ जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.



## दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

गेलीं २७ वर्षें सतत प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. २,८७,००० |
| ठेवी | ... | रु. १ कोटी १० लाखांचे वर |
| खेळतें भांडवल | ... | रु. १ कोटी ४० लाखांचे वर |

खालील वाढलेल्या दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

| | | |
|---|---|---|
| १ व २ वर्षें मुदत | द. द. शें. | ३ टक्के |
| ३ ,, ,, | ,, | ३। ,, |
| ४ ,, ,, | ,, | ३॥ ,, |
| ५ ,, ,, | ,, | ४ ,, |
| सेव्हिंग्ज बँक | ,, | २ ,, |
| होम सेव्हिंग्ज बँक | ,, | २¾ ,, |

याशिवाय दरमहा नियमित बचत करण्यासाठीं क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना गेलीं ९ वर्षें सुरू असून ती चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. या योजनेंत ३८ महिन्यांनंतर व्याजासह रक्कम परत मिळते.

दरसाल दर शेंकडा ४ टक्के दराचीं पंचवार्षिक कॅश-सर्टिफिकेट्सहि दिलीं जातात.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

विशेष माहितीसाठी समक्ष चौकशी करावी.

रविवार पेठ,
बेळगांव.

एच्. एस्. कुलकर्णी,
मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.